**मी ऐकलेल्या मैफलींच्या निमित्ताने...**

इतर कोणत्याही गायकापेक्षा पं. नारायणराव व्यास यांच्या गायनाच्या मैफली मी सर्वात जास्त ऐकलेल्या आहेत. कारण ते माझे गायनातील गुरू होते.

१९४५ साली माझे वडील मला मुंबईला पं. नारायणराव व्यास यांच्याकडे गुरुकुल पद्धतीने गाणे शिकण्यासाठी घेऊन आले. माझे वडील शाळामास्तर होते. पं. विष्णू दिगंबर यांच्याकडे गाणे शिकण्याची व गायक होण्याची त्यांची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. ती इच्छा मुलांमार्फत पूरी व्हावी असे त्यांना वाटत असे. त्यामुळे मोठमोठ्या नावाजलेल्या गळ्यांकडे आम्हाला (मी व माजी बहीण) ठेवण्याचे प्रयत्न पूर्वीपासून चालू होते. त्यामुळे साताऱ्याला दांडेकर, मिरजेला उस्ताद अब्दुल करीम खाँ तसेच पं. कृष्णराव पंडीत, पं. गजाननबुवा जोशी-अशा गुरुंकडे माझ्या गाण्याच्या शिक्षणाचा प्रवास होत होत मी पं. नारायणराव व्यास यांच्याकडे येऊन पोचलो.
पं. नारायणराव व पं. शंकरराव व्यास यांच्यासमोर माझी गाण्याची परीक्षा घेतली गेली मी 'शंकरा' व 'अडाणा' गायलो. त्यांना गाणे पसंत पडले. परंतु मी अशक्त व बारीक असल्यामुळे नारायणराव म्हणाले, 'आम्ही शिष्य ठेवतो, ते आमच्या सेवेसाठी! पण याची प्रकृती बघता आम्हालाच याची सेवा करावी लागेल. तेव्हा आणखी चार-पाच वर्षांनी त्याला पाठवा.' ते ऐकून वडील नाराज झाले. परंतु दैव बळवत्तर असल्यामुळे शंकरराव म्हणाले, 'तुला ठेवायच्या नसेल तर मी माझ्याकडे ठेवतो,'' तेव्हा नारायणराव म्हणाले, 'राहू दे, मीच माझ्याकडे ठेवतो.' तेव्हापासून घरातील सर्व कामे करून मी त्यांच्याकडे गाण्याचे शिक्षण घेऊ लागलो.
व्यासभुवनमध्ये नारायणरावांच्या घरी आलो तेव्हा आपण एखाद्या संस्थानिकाच्या घरी आलो आहोत असेच वाटले. कारण स्वतःची बिल्डिंग व तिचा तिसरा संपूर्ण मजला स्वतःकडे ठेवणारा गायक यापूर्वी मी पाहिला नव्हता. घरात नारायणरावांना सर्वजण 'नाना' म्हणत असत. इथून पुढे मीही त्यांचा उल्लेख 'नाना' असाच करीत.
हळूहळू तीन-चार वर्षात माझे ३०-४० राग शिकून झाले. आता मी नानांच्या मागे तंबोऱ्याला बसू लागलो होतो. नाना मैफलीची सुरुवात बहुदा भूप, बिहार, बागेश्री, रागेश्री अशा रागांनी करीत. नंतर दुर्गामधील गाजलेली चीन 'सखी मोटी रूम-झुम', त्यानंतर भजन व मध्यंतरानंतर दरबारी किंवा मालकंस, त्यानंतर अडाणा, भजन व भैरवी- साधारणतः असा क्रम असे- साथीला हार्मोनियम, तबला व बरेच वेळा सारंगी असे. नाना तालाला व लयीला इतके पक्के होते की उस्ताद तिरखयाँ किंवा उस्ताद अल्लारखाँ यासारख्या नामवंत तबलजींना तबल्यावर कितीही लयकारी केली तरी ते अचूक समेवर येत असत. त्यांच्या आवाजाची कधीही तक्रार नसे. रात्री दोन वाजता, पहाटे चार वाजता केव्हाही त्यांना गायला बसवले तरी आवाज मस्त लागे. आवाजाची

जात गोड, स्वच्छ, तान दाणेदार! जो राग गायचा, त्याचे दोन-तीन आलाप, त्यानंतर ख्याल. त्याची स्थायी दोनदा पूर्ण म्हणून मग अंतरा दोनदा म्हणायचा, ही 'ग्वाल्हेर'ची पद्धत. त्याप्रमाणे दोनदा स्थायी व दोनदा अंतरा म्हणून झाला की आलाप, मग मध्यलयीतील बोलताना व ताना असा क्रम असे. द्रूत बंदिश गाण्याची हीच पद्धत असे. मध्येच पुष्कळ वेळा वरचा षड्ज इकारात लावू नतो जवळ जवळ अर्धा-पाऊ मिनिट तंबोऱ्यात एक जीव होत असे. त्यावेळी ते हाताने खूण करून साथीदारांना सर्व वाद्ये एकदम हळू वाजवावयास सांगत. तो 'सां' संपला की श्रोते टाळ्यांच्या गजरात पावती देत. त्यावेळी नाना समोरच्या श्रोत्यांना उद्देशून सांगत, 'अस्सल तूप खाल्यामुळे हा श्वास इतका वेळ राहतो. डालडा खाऊन असा 'सां' लागणार नाही.'' त्यांच्या या
दमसासाप्रमाणेच त्यांची गिरकीची तान-म्हणजे 'धनिसांसां धनिसांसां, इ. घेतलेली तान सर्वांना चळित करी. एकदा ही तान पाडणं मिनिट झाल्यावर एका युरोपियन माणसाने नानांच्या घशात बॅटरीचा उजेड पाडून आज काही यंत्र नाही ना याची खात्री करून घेतली होती.
तसेच त्यांनी सारंगीवाल्याला गमरेसानिसां असे नोटिशन करून काढायला सांगितले आणि त्याने तसेच्या तसे काढले की टाळ्या पडत व सामान्य श्रोत्यांना फार मजा येई. नानांची बैठक कधीच कंटाळवाणी झाली नाही. श्रोते सदैव खुष असत.
ग्वाल्हेर घराण्यात अनवट राग फारसे नाहीत. परंतु अनवर रागांपैकी दोन राग नाना फार छान गात. सकाळी 'भैरव-बहार' व रात्री 'मालगुंजी'. 'मालगुंजी' या रागात पं. शंकरराव व्यासांनी रचलेल्या 'पनिया भरन चली जमुनाको' आणि 'मुरलीकी धून सुनी' या दोन्ही चिजा मैफलीत अनेक वेळा ठुमरी किंवा भजन गाताना नाना हार्मोनियमवर फिरणारी बोटे पाहून मोठमोठ्या पेटीवादकांना आश्चर्य वाटे. त्याचप्रमाणे तबला- त्यातल्या त्यात पं. अनोखेलाल यांचा एका बोटाने जलद लयीत वाजवला जाणारा मिताल ते इतक्या सुंदर लयीत वाजवून दाखवित की खरोखर त्यावेळी ते मोठ्या तबलजींची आठवण करून देत. (मी रात्री सतार वाजवत असे त्यावेळी ते माझ्या 'झाल्या'बरोबर अनोखेलाल यांचा 'नाधिंधिंना' वाजवीत.)
खरे तर नानांच्या कारकीर्दीची सुरुवातच आगळी-वेगळी झाली होती. हिंदू कॉलनीत गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी एके ठिकाणी पं. विनायकबुवा पटवर्धनांचा कार्यक्रम ठरला होता. पण ऐनवेळी ते येऊ शकले नाहीत. त्यांनी आपल्या ऐवजी आपले गुरुबंधू पं. नारायणराव व्यास यांचा कार्यक्रम ठेवा म्हणून सांगितले आणि सुदैवाने नानांचा तो कार्यक्रम इतका रंगला की, त्याच ठिकाणी त्यांचे पुढील अनेक कार्यक्रम ठरले.
अलाहाबाद संगीत परिषदेत दोन चषक ठेवण्यात आले होते. ज्यांचे गाणे सर्वांना आवडेल त्याला मोठा कप आणि जो गवई दुसऱ्या क्रमांकावर येईल, त्याला लहान कप! गंमत म्हणजे नानांना मोठा व उ. फैयाजखाँना लहान कप मिळाला. पण नानांनी उ. फैयाजखाँना ''तुम्हीही खूप मोठे आहात'', असे सांगितले.
एकदा राजस्थान- मध्य प्रदेश असे नानांचे एकूण १३ कार्यक्रम होते. या वेळी नानांना तबल्याची साथ मीच करणार होतो. घरी मी त्यांच्याबरोबर बरेचदा तबला वाजवीत असे; परंतु जाहीर कार्यक्रमात वाजवण्याची ही माझी पहिलीच वेळ आणि तेही तेरा कार्यक्रमांत! रतलामच्या कार्यक्रमात तंबोरे वेळेवर न आल्यामुळे तंबोरे येईपर्यंत नाना नुसत्या पेटीवर गायले. आवाजाची जात इतकी छान की पेटीवर सुद्धा मैफल रंगली. पुढे आम्ही कोटा येथे गेलो. तेथे दोन जुळे भाऊ राज्य करीत होते. हे संस्थानिक मुसलमान होते. त्यांच्याकडे रात्री जलसा होता.
रात्री १२ ला महाराज आले. त्यांच्या जेवणानंतर एक वाजता आम्हाला उठवून १.३० वाजता जलसा सुरू झाला. 'मालकंस'ने सुरुवात झाली. मग भजन, मग 'झिंझोटी' बजाव बजाव मुरली. राजे फर्माइश करीत तसे नाना गात होते. पहाटे ४.३० ला जलसा संपला.
बाकी कार्यक्रम सुंदर झाला. चांदीच्या ताटातून मखमलीच्या बरख्यातून नानांना बिदागी मिळाली. उत्तरेप्रमाणे दक्षिणेकडेही नानांचे खूप कार्यक्रम झाले. जागतिक कीर्तीच्या गायिका सुब्बलक्ष्मी या

त्यांच्याकडे काही काळ उ. हिंदुस्थानी संगीत शिकत होत्या व ''मीरा पिक्चरमध्ये मीराबाईने गायलेले 'शामसुंदर मदनमोहन' हे भजन व्यासांनी त्यांना शिकवल्यामुळे त्यांना फार फायदा झाला,'' असा उल्लेख (इंग्रजी) पास्ट फॉरवर्डच्या लेखिका गौरी रामनारायण, मराठी अनुवाद (ऋतुशैशव) उल्का राऊत या पुस्तकात मिळतो.

पु. ल. देशपांडे यांनी एका ठिकाणी म्हटले आहे की, पं. नारायणरावांनी गायलेली 'मालकंस' व 'अडाण्याची' रेकॉर्ड वाजवून वाजवून इतकी झिजली की, 'मालकंस' लावायचा असेल तर 'अडाणा' लावावा लागे. कारण पिन आत जाऊन दुसरी बाजू वाजायची.

१९३० साली नानांची पहिली रेकॉर्ड निघाली. त्यानंतरच्या तीस वर्षात त्यांच्या कमीत कमी ७० रेकॉर्ड्स निघाल्या यामध्ये मराठी व कानडी भजनांचाही समावेश होता. या सर्व रेकॉर्ड्स ३-३। मिनिटांच्या होत्या. पुढे पुढे त्यांच्या लाँग प्लेयिंग रेकॉर्ड्स सुद्धा निघाल्या.

नानांच्या घरी एकदा बेगम अख्तर आणि उस्ताद अल्लारखाँ येणार होते. बरोबर सातला ते दोघेजण आले. घर वगैरे पाहून आल्यावर दोघेही नानांना म्हणाले, 'पंडितजी, आपने रेकॉर्डमें कमाल किया है। तीन मिनिटोंमें पूरा राग उतारा है। हमने कितनी बार आपका 'अडाना' और 'मालकंस सुना है।' असे म्हणून अल्लारखाँ व बेगम अख्तर दोघांनी नानांच्या दोन्ही चिजा तशाच्या तशा म्हणून दाखवल्या यावरून त्या काळात त्या रेकॉर्ड्सचा प्रभाव केवळ सामान्यांच्यावरच नाही तर मोठ्या कलाकारांवरही किती जबरदस्त होता, दिसून येते.

नानांचे नाव सर्व हिंदुस्थानभर दुमदुमत असताना त्यांच्यावर टीकाही झाली होती. केशवराव भोळ्यांनी 'राधेकृष्ण बोल' हे नानांचे भजन हिराबाईंनी गायलेल्या रेकॉर्डपेक्षा कितीतरी पटींनी श्रेष्ठ आहे, असे लिहिले होते. पण त्याचबरोबर त्यांच्या शास्त्रीय गायनाबद्दल त्यांनी अशी टीका केली होती की, ''नारायणराव तिसऱ्या मजल्यावर राहत असले तरी त्यांची कला अजून तळमजल्यावरच आहे,'' अशा तऱ्हेची टीका झाल्यामुळे नानांनी जास्त मेहनत करायचे ठरवले. वास्तविक नाना फार मेहनत करत नसत. कारण आवाजातला गोडवा जाईल, असे त्यांना वाटे आणि तसेच झाले. दोन-तीन महिने सतत मेहनत केल्यामुळे त्यांच्या आवाजातली गोडी गेली व आपण नसत्या भानगडीत पडल्याची जाणीव त्यांना झाली.

तेव्हा त्यांनी संपूर्ण महिनाभर विश्रांती घेतली. त्यानंतर त्यांच्या आवाजातला पूर्वीचा गोडवा पुन्हा आला. तेव्हाचा आनंद काही वेगळाच होता.

१९३४ सालापासून जवळजवळ ७० सालापर्यंत नानांचे कार्यक्रम जोरात होते. पुढे थोडे थोडे कमी होऊ लागले. शास्त्रीय संगीतात त्यांनी खूप मोठी क्रांती केली. रेकॉर्ड्सच्या माध्यमातून लोक घराघरातून शास्त्रीय संगीत ऐकू लागले. जनसामान्यांत शास्त्रीय संगीताविषयी गोडी त्यांनी उत्पन्न केली हे त्यांचे संगीत क्षेत्रातील सर्वात मोठे योगदान होय. कीर्तीबरोबरच 'गायनाचार्य', 'महामहोपाध्याय', 'तान के कप्तान' अशा अनेक पदव्या त्यांना मिळाल्या.

त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये पं. वसंतराव राजोपाध्ये, मा. नवरंग, श्रीमती सुब्बलक्ष्मी, शंकर अभ्यंकर, विद्याधर व्यास, चंद्रकांत आपटे, चंद्रकांत लिमये अशा अनेकांचा समावेश आहे.

३१ मार्च १९८४ रोजी अशा आमच्या थोर, क्रांतिकारी गुरूंचे निधन झाले. परंतु त्यांचे मधुर गायन आमची पिढी कधी विसरणार नाही.

**शंकर अभ्यंकर**

**(पूर्वप्रसिद्धी : लोकसत्ता, १७ ऑक्टोबर, २००७)**